# या जीवनाने जे दिले, जन्मात ते मावेचना...!

सचिन चिटणीस



■ 'सकाळ' (मुंबई) च्या ११ व्या वर्धापनदिनानिमित्त रुईया महाविद्यालयात आयोजित 'विंदांची प्रेमगाणी' या कार्यक्रमाचा आस्वाद घेताना रसिक.

## 'सकाळ'च्या वर्धापनदिनी बहरली 'विंदांची प्रेमगाणी'

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. २८ : कविता विंदांची, तीही प्रेमकविता. पण तिची रूपे बहुढंगी, विभ्रमही नानाविध. शिवाय अनोख्या भावछटा नि हुरहूर लावणाऱ्या आठवणी यांचा अतूट संगमच... त्याला तितक्याच ताकदीने चढवलेला स्वरसाज नि एकेका कवितेसरशी मिळणारी उत्फुल्ल दाद... असा सुरेख, सुरेल अनुभव 'सकाळ' (मुंबई)च्या अकराव्या वर्धापनदिनी माटुंग्याच्या रुईया महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'विंदांची प्रेमगाणी' या मैफलीत रसिकांनी घेतला.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या विंदांच्या प्रेमभावनेचा आविष्कार, त्याचं आणि तिचं (पान २ पाहा)

### मान्यवरांची मांदियाळी

'सकाळ'च्या या मैफलीला सर्वच क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात सरोजिनी वैद्य, शंकर वैद्य, लक्ष्मण लोंढे, विंदांचे पुत्र उदय करंदीकर, प्रा. मीना गोखले, मंगेश कदम, बाजीराव दांगट, ॲड. महाबळेश्वर मोरजे, शिवकन्या कोंडवे, हेमंत जोशी, कवी जनार्दन पाटील, दिलीप कावळे, प्रकाश पुरंदरे, मनोहर वैद्य, भारतीय कामगार सेनेचे उपाध्यक्ष देवराम भोसले, विनायक महाडिक, प्रा. गजानन पाटील, दिनेश शिंदे, रच्छा मास्तर आदींचा समावेश होता.

तरोताजा. सदासर्वदा.



# 'सकाळ'च्या वर्धापनदिनी बहरली 'विंदांची प्रेमगाणी'

(पान १ वरून) नातं एवढ्यापुरताच मर्यादित नाही. टवटवीत कोवळं- अव्यक्त प्रेम, पहिली नजरभेट, कधी मिळणारं यश; तर कधी पदरी पडणारी उपेक्षा... निस्सीम त्यागाचं प्रत्यंतर, उत्कट



■ 'विंदांची प्रेमगाणी' या कार्यक्रमात यशवंत देव आणि शंकर वैद्य.

भावनांचं प्रतिबिंब; तर केव्हा विदारक वास्तवांचं भान, आर्त स्वप्नरंजन; विफल प्रेमाची व्यथा, असफल प्रेमाचा सल... कधी त्यातला पोरकट उत्साह; तर कधी परिपक्व- प्रौढ समजूतदारपणा अशी अनेक वळणं घेत ही कविता आशयघन अनुभवांचे पदर उलगडत नेते अन् प्रसंगी सोशिक संयमाचाही प्रत्यवाय देते. त्याचंच लुब्ध करणारं दर्शन घडवलं प्रसिद्ध गायक नि संगीतकार वसंत आजगावकर यांनी.

विंदांच्या प्रेमकविता जरी अनेक असल्या; तरी त्यातील निवडक पंधरा प्रेमकवितांचं सादरीकरण त्यांनी केलं नि जवळपास दोन तास रसिकही त्या अनुभवविश्वात न्हाऊन निघाले.

याच महिन्याच्या सुरवातीला आजगावकरांनी आकाशवाणीवरील 'भावसरगम'साठी विंदांची निवडलेली एक कविता सादर केली. योगायोग असा, की ते सादरीकरण संपले नि काही मिनिटांत विंदांना ज्ञानपीठ मिळाल्याची आनंदवार्ता देशाच्या कानाकोपऱ्यात पोचली. तो अनुभव ज्या कवितेनं दिला, त्या 'तुझ्या उराच्या घरट्यामध्ये झुळूक होऊनी हळूच शिरावे, तुला न देता चाहूल तुझीया निःश्वासातून निसटून जावे,' ही कविताही अनोख्या प्रेमवादळाचा प्रत्यय देऊन गेली. पण रसिकांनी ठेका धरला, 'माझी ना घाई काहीही'मधील अनुभवांना. त्यातील...

*तू झुंजूमुंजू हासशी*
*जाई-जुईचे लाजशी*

*मी वेंधळा मग सांडतो*
*थोडा चहा बाहीवरी*

हा उल्लेख होताच तुडुंब भरलेल्या सभागृहात प्रचंड हास्यस्फोट झाला.

'असेच होते म्हणायचे तर', 'जमू नये त्या वेळी जमलो', 'माझीच तू माझीच तू सांगू किती हे साजणे', 'पाहू नको सखे ग' या मार्गाने मैफल वळली 'साठीचा गझल'मधील परिपक्व नि काहीशा मिश्कील अनुभवांकडे.

*जेव्हा प्रदक्षिणा ती*
*घालीच मारुतीला*
*तेव्हा पाहायची हो*
*मूर्ती वळुनी पाठी*

या वर्णनाला भरभरून दाद न मिळती तरच नवल. नंतर मात्र मैफलीच्या सांगतेप्रसंगी 'गझल दोघांचा' ऐकता ऐकता श्रोतेही भारावले नि 'आता कितीसे चालणे, सोपा उतारच शेवटी, झाले जरा मागे- पुढे तरीही तिथे भेटू पुन्हा' हीच आठवण उरी बाळगत त्यांनी विंदांच्या प्रतिभेला मनमुराद दाद दिली...

या मैफलीत यशवंत देव यांच्या दोन आणि दत्ता डावजेकरांची एक संगीतरचनाही सादर झाली. उत्तरोत्तर रंगत गेलेल्या या मैफलीत वसंत आजगावकरांना निनाद आजगावकर (हार्मोनियम), कौस्तुभ आजगावकर (तबला), मिथिलेश पाटणकर (सिंथेसायझर), गौतम नाईक (तालवाद्ये) यांनी साथ केली. निनाद आणि सोनाली कर्णिक यांनीही काही रचना सादर केल्या.

'सकाळ'चे संस्थापक डॉ. नानासाहेब परुळेकर यांच्या प्रतिमेला सुप्रसिद्ध कवी शंकर वैद्य यांनी पुष्पहार अर्पण केल्यावर शंकर वैद्य, ज्येष्ठ संगीतकार यशवंत देव, संवादिका करुणा देव, ख्यातनाम साहित्यिका विजया राजाध्यक्ष यांनी दीपप्रज्वलन केले आणि या मैफलीला सुरवात झाली. 'सकाळ'चे संपादक (वृत्त) चंद्रशेखर कुलकर्णी यांनी प्रास्ताविक व मान्यवरांचे स्वागत केले आणि आभार मानले. या वेळी 'सकाळ परिवारा'तर्फे सर्व मान्यवरांचा तुळशीचे रोप देऊन सत्कार करण्यात आला.

# विंदांच्या प्रेम गाण्यांची संगीतमय अनुभूती



'सकाळ' (मुंबई)च्या ११व्या वर्धापनदिनानिमित्त माटुंग्याच्या रुईया महाविद्यालयात आयोजित केलेल्या 'विंदांची प्रेमगाणी' या सुरेल मैफिलीत प्रेमाचे विविध पैलू उलगडले. या संगीतमय कार्यक्रमाने रसिकांना हुरहूर लावली. या कार्यक्रमाची काही क्षणचित्रे.




■ कार्यक्रमात गीत सादर करताना प्रसिद्ध गायक आणि संगीतकार वसंत आजगावकर. सोबत हार्मोनियमची साथ करताना निनाद आजगावकर आणि गायिका सोनाली कर्णिक.





■ मैफिलीत विं. दा. करंदीकर यांचे पुत्र उदय करंदीकर सपत्निक उपस्थित होते.




■ गीतांचा आस्वाद घेताना ज्येष्ठ साहित्यिका विजया राजाध्यक्ष, ॲड. महाबळेश्वर मोरजे आणि अन्य मान्यवर.

